# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- 2/एनजीपी/संस्था स्थलांतरण /2014/८६६

दिनांक : 10 JUL 2014

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व

विद्यापीठ व्यवस्थापित आणि विद्यापीठ संस्था,

(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र पदवी संस्था)

( स्वायत्त संस्था वगळून )

विषय : शासकीय व अशासकीय अनुदानित व विद्यापीठ व्यवस्थापित आणि विद्यापीठ संस्थांमधील द्वितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतर, अभ्यासक्रम व विद्यापीठ बदलीने प्रवेश मिळणेबाबत.

संदर्भ: शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये प्रकाशित झालेल्या अभियांत्रिकी/ फार्मसी/ वास्तुशास्त्र / एचएमसीटीई या पदवी अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तिका (Information Brochure)

शैक्षणिक वर्ष 2013-2014 च्या अभियांत्रिकी/फार्मसी/वास्तुशास्त्र /एचएमसीटीई या पदवी अभ्यासक्रमाच्या संदर्भीन माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या नियमांनूसार एका शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेमधून दुस-या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेमध्ये द्वितीय वर्षात बदलीसाठी तरतूद आहे. म्हणून आपल्या आपल्या संस्थेतील जे विद्यार्थी इतर शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून) इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये प्रकाशित केलेल्या माहिती पुस्तिकेतील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून दयावेत. जे विदयार्थी आपणाकडे अर्ज करतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे (वैद्यकीय, आर्थिक अडचण, वडिलांची/पालकांची बदली इत्यादी) नमूद करुन विदयार्थ्यांची नांवे गुणानुक्रमाने एकत्रितरित्या सोबत जोडलेल्या "विवरणपत्र अ" मध्यें Microsoft Excel sheet मध्ये भरुन समर्पक कारणे व विद्यार्थ्यांचे दोन्ही अभ्यासक्रमाचे Choice Code No. भरुन आपल्या शिफारशी दिनांक 15 जुलै 2014 पूर्वी या संचालनालयास सादर करण्यांत याव्यात. तसेच dtedesk2@gmail.com या ई-मेल वर सदर माहितीची Soft copy सुध्दा उपलब्ध करून द्यावी.

याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेत/विद्यापीठामध्ये परीक्षेच्या निकालाच्या गुणांऐवजी ग्रेड पॉईंटमध्ये देण्याची पध्दत असल्यास सदर ग्रेड पॉईंटचे संपूर्ण गुणांमध्ये अथवा टक्क्यांमध्ये रुपांतरित (कनव्हर्ट) करुन गुण/टक्के नमूद करावेत.

शासकीय /अशासकीय अनुदानित स्वायत्त संस्थेस बदलीची तरतूद नसल्याची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शणास आणावी व असे अर्ज आपल्या स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत तसेच बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस कोणत्याही परिस्थितीत या संचालनालयाच्या आदेशांशिवाय लिव्हींग सर्टीफीकेट देऊ

नये अथवा त्यांचे प्रवेश रद्द करु नये, मात्र संस्थेतील सर्व बदली इच्छुक विद्यार्थ्यांचे गुणवतेच्याक्रमाने यादी तयार करतांना सदरहू विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रकार सुपरन्युमररी कोटयातील आहे किंवा कसे? याच्या उल्लेखासहीत आपल्या शिफारशीसह या कार्यालयास सादर करावी व या संदर्भात कोणत्याही विद्यार्थी व पालकांस या कार्यालयास संपर्क साधण्यास पाठविण्यांत येवू नये

येथे असेही नमूद करण्यात येते की, समर्पक कारणे व आपल्या शिफारशीं शिवाय विद्यार्थ्यांच्या अर्जांवर कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही. तसेच द्वितीय वर्षाची अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची माहिती सोबतच्या "विवरणपत्र ब" मध्ये सादर करावी. विद्यार्थी ज्या संस्थेत व अभ्यासक्रमात शिकत आहे व ज्या संस्थेत बदली मागितलेली आहे. त्या संस्थेच्या नांवासमोर इन्स्टीटयुट कोड, अभ्यासक्रमाचे नांव व कोर्स कोड नमूद करण्यांत यावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

जा. क्र. विकाअ/शिसण/स्थलांतरण/३५६०
दिनांक :- १०/७/२०१४
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.
अमरावती.

प्रत :- (१) प्राचार्य, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.
(२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरिता.

सहसचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

H:\Vijay\Kedare\Transfer\2014\Cerecular.Docx

## Statement A

### Statement showing vacancy position of Second, Third & Final year for A.Y.2013-14

**Name of the Institute:-**

| Sr.No. | Name of the Branch | Sanctioned Intake for 2014-15 | Pass out students | Students in pipeline | Internal Transfer Executed at Inititute level | Vacancy No. (4+5+6)=7 3- |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| | | | | | | |

# Statement B

**Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second /T hird year for A.Y.2014-15**

**Name of the Institute & code No:-**

| Sr. No. | Name of the Student | Name of Current Institute | Year | Course Name | Choice Code No. | Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) | Total Marks obtained (out of CGPA) | Percentage of Marks | Preferencewise Institute Name | Institute Code No. | Course Name | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks [Institute] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |